# BDC LIBRARY

New Paper Clipping

A.Y. 2024-2025

# कोयना इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

पाटण : येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले. डिप्लोमा इन केटरिंग अँड रेस्टॉरंट मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, या परीक्षेत भावना सूर्यवंशी हिने ८४.८९ टक्के गुण मिळवून सातारा विभागामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. धनराज देसाई याने ८३.७८ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर विक्रम पवार व योगेश सपकाळ यांनी ८१.७८ टक्के गुण मिळवून यश संपादन केले. इतर विद्यार्थ्यांनीही या अभ्यासक्रमाच्या परीक्षेत सर्वोत्तम यश संपादन केले आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट पाटण डिप्लोमा अभ्यासक्रमाची ही पहिलीच बॅच असून, इतर वर्षीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे या विद्यार्थ्यांनीही कॉलेजचा निकाल १०० टक्के लावण्याची परंपरा कायम ठेवली. आज कॉलेज कॅम्पसमधून विद्यार्थ्यांची निवड होऊन ५ स्टार हॉटेल्समध्ये ट्रेनिंग घेत आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण तसेच जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर आणि अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण यांनी केले. हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य चेतन सावंत यांनी कौतुक केले. (वा. प्र.)